PUBLICATION – SAKAL
DATE – FEBRUARY 07, 2013
PAGE NO – 12 (PUNE TODAY)

# अवतीभवती



येरवडा : सीझन्स गोल्फ स्पर्धेत सांघिक गटात विजेते ठरलेले जे. एस. नौरथ व संजय नाईक हे खेळाडू गौरी नाईकनवरे यांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना. शेजारी नरोत्तम चौधरी, सविता नाईकनवरे, जयदीप पटवर्धन, रणजित नाईकनवरे व हेमंत नाईकनवरे.

## सीझन करंडक गोल्फ स्पर्धेत एस. नौरथ, संजय नाईक विजेते

पुणे, ता. ६ : सीझन करंडक २०१३ गोल्फ स्पर्धेत जे. एस. नौरथ व संजय नाईक यांच्या संघाने ४४ गुणांसह विजेतेपद पटकाविले. जितू शहा व संजय भिंगारवाला यांच्या संघास ४२ गुणांसह उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. सीझन अपार्टमेंट हॉटेल व नाईकनवरे डेव्हलपर्स यांच्या संयुक्त विद्यमाने येरवडा येथील पुणे गोल्फ कोर्सवर संपलेल्या या स्पर्धेत १४४ खेळाडूंचा सहभाग होता. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ नाईकनवरे डेव्हलपर्सच्या संचालिका गौरी नाईकनवरे यांच्या हस्ते झाला. या वेळी रणजित नाईकंनवरे, हेमंत नाईकनवरे, पूना गोल्फ क्लबचे अध्यक्ष जयदीप पटवर्धन व कप्तान नरोत्तम चौधरी आदी उपस्थित होते. जे. एस. नौरथ, सतीश कतारिया, महेश कुमार, राजा शिंदे, रणजित खेर, सतीश शितुत यांनी वैयक्तिक पारितोषिके मिळविली.